**L. A. BILL No. XXVII OF 2022.**

A BILL

TO PROVIDE FOR CREATION OF SUPERNUMERARY POSTS IN THE CADRE OF CIVIL SERVICES AND POSTS OF THE GOVERNMENT, GOVERNMENT DEPARTMENTS AND OFFICES OR AUTHORITIES SUBORDINATE THERETO AND TO APPOINT CANDIDATES SELECTED AND RECOMMENDED BY SELECTION AUTHORITIES THEREON.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.**

**शासनाच्या, शासकीय विभागांच्या आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांच्या किंवा प्राधिकरणांच्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गात अधिसंख्य पदे निर्माण करण्यासाठी आणि निवड प्राधिकरणांनी निवड केलेल्या व शिफारस केलेल्या उमेदवारांची त्यांवर नियुक्ती करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** शासनाच्या, शासकीय विभागांच्या आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांच्या किंवा प्राधिकरणांच्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गात अधिसंख्य पदे निर्माण करण्यासाठी आणि निवड प्राधिकरणांनी निवड केलेल्या व शिफारस केलेल्या उमेदवारांची त्यांवर नियुक्ती करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी ९९७–१ (१४०—८-२०२२)

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " सक्षम प्राधिकरण " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संवर्गातील पदांवर उमेदवारांची निवड किंवा नियुक्ती करण्याकरिता सक्षम असणारे प्राधिकरण, असा आहे ;

(ख) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(घ) " निवड प्राधिकरण " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि शासन, शासकीय विभाग व त्यांची दुय्यम कार्यालये किंवा प्राधिकरणे यांच्या सेवा व पदे यांसाठी उमेदवारांची निवड करण्यासाठी सक्षम असणारी इतर निवड प्राधिकरणे, असा आहे ;

(ड) " उमेदवार " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गामधील नियुक्त्यांसाठी संबंधित निवड प्राधिकरणाने निवड केलेले व शिफारस केलेले उमेदवार, असा आहे.

अधिसंख्य पदांची निर्मिती.

**३.** कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात अथवा शासनाने, शासकीय विभागांनी आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांनी किंवा प्राधिकरणांनी काढलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये किंवा आदेशांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गांमध्ये अधिसंख्य पदे निर्माण करण्यात येतील.

नागरी सेवा व पदे यांमधील उमेदवारांच्या निवडीची विधिग्राह्यता; आणि त्यांच्या नियुक्त्या.

**४.** (१) कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात अथवा शासनाने काढलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये किंवा आदेशांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या उमेदवारांची, शासनाच्या, शासकीय विभागांच्या आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांच्या किंवा प्राधिकरणांच्या नागरी सेवा व पदे यांवर नियुक्त्या करण्यासाठी निवड प्राधिकरणाने निवड केलेली आहे, आणि ज्यांची नावे, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गामध्ये अशा नियुक्त्या करण्यासाठी ९ सप्टेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी शासनाकडे किंवा शासकीय विभागांकडे आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांकडे किंवा प्राधिकरणांकडे अथवा सक्षम प्राधिकरणांकडे शिफारस केलेली आहेत अशा उमेदवारांची, वैध रीतीने निवड करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि अशा उमेदवारांची, शासनाच्या, शासकीय विभागांच्या आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांच्या किंवा प्राधिकरणांच्या संबंधित संवर्गांमध्ये, कलम ३ अन्वये निर्माण केलेल्या अधिसंख्य पदांवर, उक्त संवर्गांसाठी व पदांसाठी लागू असलेल्या संबंधित नियमांच्या प्रक्रियेनुसार, नियुक्ती करण्यात येईल.

(२) संबंधित शासकीय विभाग आणि त्यांची दुय्यम कार्यालये किंवा प्राधिकरणे, त्यासाठीच्या प्रक्रियेचे अनुसरण करून, उक्त उमेदवारांना नियुक्ती देतील.

(३) अशा उमेदवारांना, सेवेमध्ये रुजू होण्याचा विकल्प देण्यात येईल. उमेदवार, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत सेवेमध्ये रुजू होतील. उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर कोणत्याही उमेदवारास सेवेमध्ये रुजू होण्यास मुभा देण्यात येणार नाही.

(४) शासनास, अधिनियमाच्या अनुपालनाकरिता आवश्यक सूचना किंवा आदेश काढता येतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**अनुसूची**

(कलमे ३ व ४ पहा)

| अ.क्र. (१) | विभागाचे नाव (२) | संवर्ग (३) | गट (४) | पदांची संख्या (५) |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन विभाग. | (एक) कक्ष अधिकारी | ब | १ |
| | | (दोन) लिपिक-नि-टंकलेखक | क | १२ |
| २ | महसूल व वन विभाग. | (एक) उप जिल्हाधिकारी | अ | ३ |
| | | (दोन) तहसीलदार | अ | १० |
| | | (तीन) उप अधीक्षक | ब | १ |
| | | (चार) नायब तहसीलदार | ब | १३ |
| | | (पाच) वनरक्षक | क | १० |
| | | (सहा) लिपिक | क | ४ |
| | | (सात) तलाठी | क | १० |
| | | (आठ) शिपाई | ड | २ |
| ३ | कृषी, पशुसंवर्धन, | (एक) कृषी सहायक | क | १३ |
| | दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग. | (दोन) पशुधन पर्यवेक्षक | क | १ |
| ४ | वित्त विभाग. | (एक) राज्य सहायक कर आयुक्त | अ | ३ |
| | | (दोन) राज्य कर निरीक्षक | ब | १३ |
| | | (तीन) वरिष्ठ सहायक (लेखा) | ब | १ |
| | | (चार) कर सहायक | क | १२ |
| ५ | ग्राम विकास विभाग. | (एक) आरोग्य सेवक (पुरुष) | क | ४ |
| | | (दोन) ग्रामसेवक | क | १ |
| | | (तीन) आरोग्य सेवक (स्त्री) | क | ४ |
| | | (चार) कनिष्ठ अभियंता सूक्ष्म सिंचन | क | १ |
| | | (पाच) स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | क | ३ |
| | | (सहा) कनिष्ठ अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) | क | १ |
| | | (सात) पशुधन पर्यवेक्षक | क | १ |
| | | (आठ) परिचर | ड | २ |
| ६ | नगरविकास विभाग. | (एक) पशुवैद्यकीय अधिकारी | अ | २ |
| | | (दोन) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ब | २ |
| | | (तीन) दुय्यम अभियंता (स्थापत्य) | ब | २ |
| | | (चार) दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) | ब | १ |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | (पाच) जन्म नोंदणी कारकुन/ मृत्यू नोंदणी कारकुन/ नोटीस कारकुन | क | ९ |
| | | (सहा) शाखा अभियंता | ब | १ |
| | | (सात) कनिष्ठ अभियंता | क | १ |
| | | (आठ) कनिष्ठ अभियंता (संकेतन व दूरसंचारण) | क | १ |
| | | (नऊ) कनिष्ठ अभियंता (भांडार) | क | १ |
| | | (दहा) (स्थानक नियंत्रक) | क | ३ |
| | | (अकरा) सुरक्षा पर्यवेक्षक-II | क | १ |
| | | (बारा) तंत्रज्ञ स्थापत्य-II | क | १ |
| | | (तेरा) तंत्रज्ञ (आपत्कालीन परिरक्षा) | क | १ |
| | | (चौदा) तंत्रज्ञ (आपत्कालीन परिरक्षा-II) | क | २ |
| | | (पंधरा) तंत्रज्ञ-I | क | १ |
| | | (सोळा) तंत्रज्ञ (संकेतन व दूरसंचारण-II) | क | ९ |
| | | (सतरा) तंत्रज्ञ-II | क | १६ |
| | | (अठरा) मदतनीस | ड | २ |
| ७ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग. (उद्योग संचालनालय) | (एक) उद्योग उप संचालक (तांत्रिक) | अ | २ |
| | | (दोन) उद्योग अधिकारी | ब | १२ |
| | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ. | (एक) कार्यकारी अभियंता | अ | १ |
| | | (दोन) उप अभियंता (विद्युत व यांत्रिकी) | अ | १ |
| | महानिर्मिती | तंत्रज्ञ-III | क | ८५ |
| | महावितरण | (एक) अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | वेतन गट १ | १ |
| | | (दोन) अतिरिक्त कार्यकारी अभियंता (वितरण) | वेतन गट १ | ४ |
| | | (तीन) उप कार्यकारी अभियंता (वितरण) | वेतन गट २ | ७ |
| | | (चार) उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | वेतन गट २ | १ |
| | | (पाच) सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | वेतन गट २ | ४ |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | (सहा) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | वेतन गट ३ | २ |
| | | (सात) विद्युत सहायक | वेतन गट ४ | ३९१ |
| | | (आठ) पदवीधर शिकाऊ अभियंता (स्थापत्य) | ब | ४ |
| | | (नऊ) पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण) | क | ४३ |
| | | (दहा) पदविकाधारक शिकाऊ अभियंता (स्थापत्य) | क | २ |
| | | (अकरा) पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण) (अंतर्गत अधिसूचना) | क | ५ |
| | | (बारा) उपकेंद्र सहाय्यक | क | २७९ |
| ८ | आदिवासी विकास विभाग | अधीक्षक (स्त्री) | क | १ |
| ९ | सार्वजनिक बांधकाम विभाग. | (एक) स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | ब | ३ |
| | | (दोन) कनिष्ठ लिपिक | क | ३ |
| | | (तीन) कनिष्ठ लिपिक-टंकलेखक | क | ३ |
| | | (चार) खानसामा | ड | २ |
| | | (पाच) मैलमजूर | ड | ६ |
| | | (सहा) चौकीदार | ड | २ |
| | | (सात) शिपाई | ड | ३ |

**अनुसूची**—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १० | गृह विभाग | (एक) पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त | अ | १ |
| | राज्य उत्पादन शुल्क | (एक) सहायक आयुक्त | अ | १ |
| | | (दोन) उप अधीक्षक | ब | ५ |
| | | (तीन) दुय्यम निरीक्षक | क | ३ |
| ११ | शालेय शिक्षण विभाग | उप शिक्षण अधिकारी | अ | ४ |
| १२ | वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग/ जिल्हा परिषद. | औषध निर्माण अधिकारी | ब | १ |
| | | | एकूण | **१०६४** |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.]**

**[शासनाच्या, शासकीय विभागांच्या आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांच्या किंवा प्राधिकरणांच्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गात अधिसंख्य पदे निर्माण करण्यासाठी आणि निवड प्राधिकरणांनी निवड केलेल्या व शिफारस केलेल्या उमेदवारांची त्यांवर नियुक्ती करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. एकनाथ संभाजी शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई